ठाणे महानगरपालिका,

वृक्षप्राधिकरण

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ चे कलम ८ (३) अन्वये

## जाहीर सूचना

ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिकेच्या मंजुर विकास आराखडयानुसार रस्त्याच्या बांधकामाची परवानगी, सक्षम प्राधिकरण / सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेली असून मा.कार्यकारी अभियंता, रस्ते प्रकल्प ठाणे महानगरपालिका, ठाणे यांच्या मार्फत दिवा प्रभाग समिती क्षेत्रातील १. कल्याण फाटा दत्तमंदीर ते २५ मी. डी.पी. रस्त्यापर्यंत ३० मी. रूंद डी.पी. रस्ता, २. कल्याण शिळ रस्त्यापासून घन कचरा प्रक्रीया केंद्राकरीता राखीव भुखंडाकडे जाणारा २५ मी. रूंद डी.पी. रस्ता, ३. मिनार रेसिडेंन्सी ते कल्याण-शिळ रोड पर्यंत २५ मी व ४५ मी रूंद डी.पी. रस्ता या ठिकाणावरील रस्त्याच्या बांधकामात बाधित होणारे वृक्ष तोडणे / पुनर्रोपण करीता अर्ज प्राप्त झाला आहे.

ज्याअर्थी, अर्जदार यांनी सदर प्रस्तावांतर्गत मंजुर नकाशे / आराखडे यामधील नियोजित रस्ते प्रकल्पाच्या बांधकामात बाधित होणा-या वृक्षांपैकी जे वृक्ष तांत्रिकदृष्टया पुनर्रोपण करणे शक्य असणारे वृक्ष पुनर्रोपण करणे व तांत्रिकदृष्टया पुनर्रोपण करण्यास अशक्य असणारे वृक्ष तोडणे याकरीता वर नमूद अधिनियमातील कलम ८ (२) अन्वये वृक्षप्राधिकरणाकडे लेखी अर्ज सादर केला आहे.

ज्याअर्थी, वृक्षप्राधिकरणाकडे प्राप्त झालेल्या अर्जाबाबत अधिनियमातील कलम ८ (३) अन्वये स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन कमाल ०७ दिवस कालावधीमध्ये हरकती तथा सुचना मागविण्याचे सुचित केले आहे.

त्याअनुषंगाने वर नमूद अर्जदार यांनी प्रस्तावित रस्त्याच्या कामाअंतर्गत बाधित ३२३ वृक्ष पुनर्रोपण करणे व ४८ वृक्ष तोडणे या अर्जाच्या अनुषंगाने तसेच मा. मुंबई उच्च न्यायालय जनहित याचिका क्र. ११९/२०१७ च्या अंतरिम आदेशातील अटी व शर्तीस अधीन राहून सदर जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी हरकती तथा सूचना असल्यास लेखी स्वरुपात ठाणे महानगरपालिका नागरी सुविधा केंद्र, तळ मजला, प्रशासकीय भवन, डॉ.अल्मेडा रोड, पाचपाखाडी, ठाणे (प.) येथे जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या मुदतीत दाखल कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती तथा सूचनां ग्राहय राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

(डॉ. अनुराधा बाबर)
सहाय्यक आयुक्त तथा वृक्ष अधिकारी
ठाणे महानगरपालिका, ठाणे.